महाराष्ट्र लोकसेवा आयोग

Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२७९५९०० फॅक्स : २२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बॅंक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


# वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट-अ, (श्रेणी - २) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालय , आदिवासी विकास विभाग

**धारिका क्रमांक :९६६(९)/३५८४/पंधरा** **जाहिरात क्रमांक : १५/२०२०**

आयोगामार्फत महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागांतर्गत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संचालनालयातील **वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट- अ, (श्रेणी - २)** या पदाच्या ७ जागांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी खालील अटी व अर्हतांची पुर्तता करणारे उमेदवार अर्ज करु शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- ७**

| जात प्रवर्ग | अ.जा | अ.ज | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | सा.व.शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | इ.मा.व | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | १ | ५ | २ | ७ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | | | |
| **सर्वसाधारण** | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ | १ | १ | ५ | १ | ६ |
| **अ)महिला**(३०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १* | १* |
| **ब)खेळाडू**(५%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **क)दिव्यांग** (४%) | एकुण पदांपेकी एक पद अस्थिव्यंगता(Locomotor Disability)/कुष्ठरोग मुक्त(Leprosy Cured)/आम्ल हल्लाग्रस्त(Acid Attack Victims) या प्रवर्गाच्या दिव्यागांसाठी आरक्षित | | | | | | | | | | | | |
| (* उपलब्ध असल्यास महिलांसाठी आरक्षित) | | | | | | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** शासन निर्णय, क्र. दिव्यांग २०१८/प्र.क्र.११४/१६- अ, दिनांक २९ मे,२०१९ अन्वये सदर पदासाठी शासन निर्णयातील परिच्छेद १ (क) मधील अस्थिव्यंगता/कुष्ठरोग मुक्त/आम्ल हल्लाग्रस्त या प्रवर्गाचे उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

**२.३** महिला आरक्षण व त्या संदर्भातील नॉन क्रिमीलेयर (NCL) तसेच मागासवर्गीय आरक्षण व त्यासंदर्भातील नॉन क्रिमीलेयर (NCL) प्रमाणपत्राचा नमुना आणि इतर अटी व शर्तीबाबत उमेदवारांनी आयोगाच्या संकेतस्थळावरील "सरळसेवा भरती " विभागातील "उमेदवारांना सर्वसाधारण सुचनांचे" काळजीपुर्वक अवलोकन करुनच त्याचे अनुपालन करावे.

**३. वेतनश्रेणी : S- २०, रु ५६,१०० - रु १,७७,५००/ + इतर भत्ते**

**४. पात्रता विषयक अटी**

**४.१** उमेदवार भारतीय नागरीक असावा.

**४.२ वय**—१) **दिनांक १ डिसेंबर, २०२०** रोजी खुला (सर्वसाधारण) उमेदवारांकरिता ३८ वर्षे व मागासप्रवर्गासाठी ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**४.३** शासन सेवेत पुर्णवेळ कार्यरत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल. तथापि, शासनसेवेतील मागासवर्गीय उमेदवारांचे वयोमर्यादेतील सवलती ऐवजी, शासन कर्मचारी म्हणून ५ वर्षाची एकच सवलत उपलब्ध राहील.

**४.४ शैक्षणिक अर्हता** — The candidates must Possess Post - Graduate degree in Social Science or Anthropology

**AND THEREAFTER**

**४.५ अनुभव** — Possess practical experience for a period of not less than three years in any field of tribal, social welfare or tribal research,

**४.६ प्राधान्यशील अर्हता** — Preference may be given to candidate who possess M. Phil or Ph.D. in Social Science or Anthropology.

**४.७** Have adequate knowledge of Marathi.

**४.८** अपवादात्मक शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी आयोग विचार करु शकेल. परंतु आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी पुरेसे उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील.

**४.९** मागास वर्गवारीच्या उमेदवारांसाठी आरक्षित जागा भरण्यासाठी त्यासाठीची आवश्यक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव धारण करणारे उमेदवार पुरेशा संख्येत उपलब्ध झाले नाहीत तर अशा वर्गवारीतील आरक्षित जागा भरण्याच्या दृष्टीने अशा वर्गवारीतील उमेदवारांची निवड करण्यासाठी अनुभव कालावधी शिथिल करण्याबाबत आयोग स्वेच्छाधिकारा नुसार विचार करु शकेल.

**४.१०** उमेदवारांनी अर्जात नमूद शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या दाव्याच्या अनुषंगाने आयोगाने मागणी केल्यानंतर शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रांची प्रत विहीत कालावधीत उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

**५.** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक असेल.

**६. परिविक्षाधीन कालावधी २ वर्षे राहील.**

**७.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव किंवा अन्य योग्य निकष याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**८. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**९. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१०. शुल्क :** खुला उमेदवारांकरिता - **रु. ६९९/-** २) मागासवर्गीय उमेदवारांकरिता - **रु. ४२९/-**

**११. अर्ज करण्याची पध्दत —**

**११.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**११.२** पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज https://.mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ११ ऑगस्ट, २०२० ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**११.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://.mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**११.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**११.५** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरी सुविधा केंद्र)

**११.६** https://.mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**११.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) "माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' **Unpaid** ' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी '**Pay Now**' अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **"Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील.
(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे
(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.
(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.
(६) उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.
(७) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१२.** चाळणी परीक्षा घ्यावयाचे ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांका नंतर अथवा परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणीपरीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१३.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१४.** समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-३ १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४, वरील शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक संकिर्ण -१११८/प्र.क्र. ३९/१६- अ दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**१५.** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवास (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेयर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

**१६.** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) उमेदवारांकरिता शासननिर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांकःसीबीसी १०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहिल तसेच शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांकःसीबीसी १०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासवर्गाकरिता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) आरक्षणाकरिता ग्राह्य धरण्यात येईल.

**१७.** आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील (ईडब्ल्युएस)उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांकःराआधो४०१९/प्र.क्र.३१/१६-अ दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

**१८.** मुलाखतीसाठी अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांना, मुलाखतीचे वेळी सर्व मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**१९.** चाळणी परीक्षा घेतल्यास चाळणी परीक्षेचे गुण व मुलाखतीचे गुण एकत्रितरित्या विचारात घेऊन तर चाळणी परीक्षा न झाल्यास केवळ मुलाखतीच्या गुणांच्या आधारे उमेदवाराची शिफारस करण्यात येईल. तथापि, महाराष्ट्र लोकसेवा आयोग कार्यनियमावलीतील नियम ९ (ix) नुसार ज्या उमेदवारांना मुलाखती मध्ये ४१% व त्यापेक्षा जास्त गुण मिळतील त्यांचाच शिफारशीकरिता विचारात केला जाईल .

**२०.** खुला (सर्वसाधारण) उमेदवारांकरिता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषांसंदर्भातील अटींची पूर्तता करणा-या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) खुला (सर्वसाधारण) पदावरील शिफारशीकरिता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/ उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

**२१.** सेवाप्रवेशाच्या प्रयोजनासाठी शासनाने मागास म्हणून मान्यता दिलेल्या समाजाच्या वयोमर्यादेमध्ये सवलत घेतलेल्या उमेदवारांचा खुला (सर्वसाधारण) पदावरील निवडीकरिता विचार करणेबाबत शासनाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्यात येईल.

याबाबतचा तपशिल वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**२२.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक किंवा संपर्क साधने आणण्यास, बाळगण्यास वापरण्यास सक्त मनाई आहे.

**२३. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ३१ ऑगस्ट, २०२० रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**२४. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २ सप्टेंबर, २०२० पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

**ठिकाण :- मुंबई**
**दिनांक :- ११ ऑगस्ट, २०२०**

**उप सचिव (सरळ सेवा-१)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**